
RNI - No. MAHMAR 36829-2010 SN -2229-4929
Post Registration No.: Akshar Wangmay - RNP/OMD/377/2016 - 2018




आत्माभिमानी व ... जक व
सांस्कृतिक जीवनाची वास्तव मा ... डेकर यांनी
दिली आहे.

लेखक : प्राचार्य शिवमूर्ती भांडेकर, प्रमण ... ५८ ... क : मुक्तरंग प्रकाशन, लातूर

प्रति, Book-Post

इंटरनेट आवृत्तीचे संकेतस्थळ
www.prabhune.com

प्रेषक,
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, 'प्रणव' रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, जि. लातूर-४१३५१५

'अक्षर वाङ्मय' हे मासिक कॉम्प प्रिंट कल्पना प्रा. लि. ४६१/४, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे-४११०३० येथे मुद्रित करून प्रकाशक रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी यांनी प्रतीक प्रकाशन, 'प्रणव' रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, जि. लातूर-४१३५१५ येथे प्रकाशित केले.

# अक्षर वाङ्मय

जुलै - ऑगस्ट - सप्टेंबर २०१७
वर्ष : आठवे अंक : पहिला



संपादक : डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

R. N. I. FOR INDIA New Delhi
R. No. – MAHMAR-36829-2010
ISSN – 2229-4929

# AKSHAR WANGMAY

**Year : 8 - Volume : 1**
**July-August-September 2017**

Editor-in-Chief
**Dr. Nanasaheb Suryawanshi**

Executive Editor
**Dr. Shivajirao Deshmukh**

Advisor
**Dr. Arun Prabhune**

Well-wisher
**Mr. Santosh Kadole**

Editorial Board

**Dr. Vijay Warkad**
**Dr. Satish Kadam**
**Dr. Deepak Chiddarwar**
**Dr. Mahadeo Walunj**

Publisher : Sou. Rekhatai Nanasaheb Suryawanshi, Pratik Prakashan, 'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515
Printer : Comp- Print Kalpana Private Ltd., 461/4 Sadashiv Peth, Pune - 30

**Address for sending articles and fees :** Dr. Nanasaheb Suryawanshi
'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515
District : Latur
Mobile phone : 9423655841
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

**Subscription Rates Yearly :** Rs. 500/- **Five Years :** Rs. 2000/-
**Two years :** Rs. 900/- **Current Volume :** Rs. 125/-

* Maharashtra State Literary and Cultural Board has granted funds for the Publication of this Journal. But Maharashtra State Literary and Cultural Board has not been responsible for writers opinion in this Journal.
* The content and opinions expressed in the articles are the views of the authors and do not necessarily reflect the views and opinions of the periodical's Editorial Board, publisher or the advisor. The authors are solely responsible for the facts and accuracy of the content of the articles.

## अनुक्रम

❑ संपादकीय ---------- ४
❑ मुखपृष्ठाविषयी ---------- ७
❑ About the cover page ---------- २६
❑ तुकारामांच्या विचारधारेचे स्वरूप ---------- ४५
डॉ. एस. एम. कानडजे
❑ अनुवाद आणि मराठी साहित्य ---------- ५३
डॉ. गणेश मोहिते
❑ शरश्चंद्र मुक्तिबोधांचा लौकिकतावादी साहित्यविचार ---------- ६३
देवानंद सोनटक्के
❑ बैठकीची लावणी ते संगीतबारी ---------- ७६
प्रा. आबासाहेब शिंदे
❑ मराठीतील प्राणिकथा : स्वरूप आणि संकल्पना ---------- ८५
प्रा. डी. जे. दमामे
❑ अरुण कोलटकर यांची 'द्रोण' कविता ---------- ९४
डॉ. वैजयंतीमाला जाधव
❑ बहिणाबाईंच्या कवितेतील कृषक जाणिवांचे चित्रण ---------- १००
डॉ. दीपक चिद्दरवार
❑ 'जू' नावडत्या भारतीय स्त्रीजीवनाचे 'दस्तऐवज' ---------- ११०
डॉ. लता पवार
❑ काळ्या मातीचं ऋण फेडणारा काव्यसंग्रह : 'अथक' ---------- ११५
डॉ. व्यंकटी पावडे
❑ 'मी' आणि 'माझा' लेखनप्रवास ---------- १२१
लतिका चौधरी
❑ 'अक्षर वाङ्मय'चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार ---------- १२७
❑ प्रतिक्रिया ---------- १२९
❑ संपादक मंडळ ---------- १३२

# 'जू' नावडत्या भारतीय स्त्री जीवनाचे दस्तऐवज

- डॉ. लता पवार

राजाराणीची गोष्ट सांगताना आजी नेहमी सांगायची, 'एक होता राजा, त्याला होत्या दोन राण्या. एक होती आवडती. एक होती नावडती. आवडती राजाच्या महालात राहायची. नावडती गावाबाहेरच्या झोपडीत राहायची.' इथून पुढे आवडतीच्या सुखाच्या आणि नावडतीच्या अतोनात कष्टाच्या कहाणीचा पट उलगडत जायचा. हीच पूर्वापार चालत आलेली नावडतीची कहाणी 'जू' मधून आलेली आहे. आपला देश विविधतेने नटलेला आहे. त्याला हजारो वर्षांची परंपरा आहे. त्या परंपरेने स्त्रीला देवता मानले आहे. अगदी 'यत्र नार्यस्तु पूज्यते रमन्ते तत्र देवता' असे असूनही 'इंदूबाई'सारख्या नावडत्या ठरलेल्या हजारो स्त्रिया जे जीवन जगत असतात त्याचाच लेखाजोखा 'जू' या आत्मकथनातून आलेला आहे. भारतीय पुरुषसत्ताक व्यवस्थेत एखादी स्त्री जर का तिच्या नवऱ्याची नावडती झाली की मग ती कितीही सुंदर असो, गुणी असो, कष्टाळू असो, कर्तबगार असो तिची 'इंदूबाई' होणारच. नातेवाईक, समाज सारेच तिच्याकडे स्वत:तल्या विकृत वासना, हिंसक वृत्ती शमविण्याची वस्तू म्हणूनच पाहतात. जगातले सगळे दोष तिला चिकटवले जातात. सर्व बाजूंनी तिला अपयशी ठरविण्याचे प्रयत्न होतात.

आपल्या भारतीय भरजरी वस्त्रासारख्या देखण्या संस्कृतीतील नावडत्या भारतीय स्त्रीच्या जीवनाचे अस्तर ऐश्वर्य पाटेकर यांनी आपल्या आईच्या कर्मकहाणीतून अलगद उलगडून दाखवले आहे. 'जू'मध्ये लेखकाच्या जन्मापूर्वीपासूनचे जीवन कथन आहे. लेखकाची आई जात्यावर दळताना ओव्या गायची, त्यातून तिच्या जगण्याचं रामायण, महाभारत चितारायचं. 'तोच चित्तरपट माझ्या काळजात जमा व्हायचा, विटेवर वीट रचत जाऊ तसा थर साचत जायचा !' असे पाटेकर स्वत: सांगतात. आई इंदूबाई नवऱ्याची नावडती बायको होती. त्यामुळे नावडत्या स्त्रीचा



...ताई नानासाहेब सूर्यवंशी यांना प्रतीक प्रकाशन, 'प्रणव' रुक्म नगर, थोडगा रोड, अहमदपूर, जि. लातूर-४१३५१५ येथे प्रकाशित केले.

सारा वनवास तिच्या वाट्याला आला. तिच्या हालअपेष्टांना पारावार उरला नाही. नवऱ्याला आणि त्याच्या घरच्यांना तर ती जगूच नये असे वाटत होते. तिला तिच्या हक्कांपासून हुसकावून लावण्याचे आटोकाट प्रयत्न सुरू होतात. एवढंच नाही, तर माहेरच्यांनाही तिचं अन् तिच्या मुलाबाळांचं ओझं वाटायला लागतं. समाजातील नतंद्रष्ट लोकही तिच्या आयुष्यात काटे पेरतात. अशा परिस्थितीतही इंदूच्या सर्व बाजूंनी फाटत जाणाऱ्या संसाराला टाका घालू पाहणारी दलित जिजा, इंदू कांद्याच्या चाळीवर रात्रपाळीच्या कामावर गेल्यावर खिजलेल्या तिच्या तान्ह्याला आपले दूध पाजणारी चांभाराची चंद्रभागा, सासरच्यांनी इंदूचे घर पाडून टाकल्यावर अर्ध्या रात्री हातात कंदील अन् भाजी-भाकरी घेऊन येणारी राजवाड्यातील पमाई, जिवावर उदार होऊन मरणाच्या दारातून इंदूला वाचवणारी दलित शांता आजी, एक तरी भाकर उरवून पदरात गुंडाळून आणणारी दुर्गा वहिनी, रोज रात्री कालवण देणारी सीता वहिनी, शाळा नको मी शेतीच करीन म्हणत हटून बसलेल्या भावड्याला शेतीच्या शाळेतील कष्टांचा, यातनांचा प्रत्यक्ष अनुभव देऊन पुन्हा स्वत: परीक्षा फी भरून त्याला शाळेत पाठवणारा विठ्ठल तात्या, पोरगं शाळेत जायला तयार झालं म्हणून आनंदाने त्याला कुळदाची जिलेबी खाऊ घालणारी राधाई, माईच्या जळालेल्या नवऱ्याला दवाखान्यात नेण्यासाठी सोन्याचं कानातलं काढून देणारी वत्सला अक्का, स्वजनांचे बोलणे खाऊनही आपल्या दुबळ्या साल्याला शाळेसाठी स्वत:कडे ठेवून घेणारा टेलर दाजी, भावड्याचे दिलदारपणे कौतुक करत त्याला जाहीर प्रतिष्ठा मिळवून देणारे रामराव सर, इंदूच्या पाठीशी उभा राहणारा अंबर मामा, अशी काही माणुसकीने ओथंबलेल्या माणसांतील माणूसपण पाटेकरांनी आपल्या आत्मकथनातून प्रवाहित केले आहे. नावडतीचं जळतं 'जू' मानेवर घेत दु:ख नांगरत मुलांच्या भविष्यात उजेडाची पेरणी करू पाहणारी आई इंदूबाई ही तर अदम्य जिद्दच आहे. एकामागून एक येणारी संकटे, इंदूच्या आईचा झालेला मृत्यू, वडिलांचे भग्न मन:स्थितीतील घर सोडून जाणे, लहानग्या भावंडांचा सांभाळ करण्याची जबाबदारी इंदूवर येऊन पडणे, नवऱ्याने दुसरे लग्न करणे, मोठ्या कष्टाने उभे केलेले घर सासूने पाडून टाकणे, कांद्याच्या चाळीवर रात्रपाळी करताना तान्ह्या लेकरासाठी अर्ध्या रात्री घराचा रस्ता धरला तर अंधारात भुरळ पडून रात्रभर रान तुडवत सैरभैर होणे, कोर्टात आपली बाजू खरी करण्यासाठी नवऱ्याने मुलांना